

PTVA Schools
# दर्पण
For private circulation only

### वसंत ऋतुचे आगमन !

फाल्गुनातल्या कृष्ण प्रतिपदेपासून वसंतोत्सव सुरू झाला आहे. इंग्रजीमधे ज्याला स्प्रिंग म्हणतात त्या ऋतुराज वसंताच्या आगमनाने सर्व सृष्टी आनंदली आहे. झाडांना नवी पालवी फुटलीय, फळांचा राजा आंब्याचीही आगमन होत आहे. कोकिळ पक्ष्याचे मधूर स्वर ऐकू यायला लागलेत. वातावरण चैतन्यमय झालंय. चैत्र महिना आणि वैशाखातील काही दिवस वसंत ऋतूचा आनंद लुटू या.

VOLUME: 01 | ISSUE:03 | 8 PAGES
March 2023

## माझा मराठीची बोलू कौतुके


लतिका ठाकूर

**परि अमृतातेंही पैजा जिंके ||**

२७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा गौरव दिन साजरा झाला. त्यानिमित्ताने पुन्हा दरवर्षीप्रमाणे मराठी शाळांचा मुद्दा चर्चिला गेला. मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असणे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक धोरणातही (NEP) प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले गेले पाहिजे असे सांगितले आहे. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीची बीजं मातृभाषेच्या, स्वभाषेच्या मातीतच पोसली जातात.

आज सर्वच क्षेत्रातील नावाजलेली व्यक्तिमत्त्वे अभ्यासली तर एक समान दुवा सापडतो, तो म्हणजे त्यांचे मातृभाषेतील शिक्षण. विद्यार्थ्यांचा बौद्धिक, मानसिक, भावनिक, वैचारिक विकास परिपूर्ण होण्यासाठी मातृभाषेसारखे दुसरे साधन नाही.

हजारो वर्षांपूर्वी भारतीय ऋषीमुनींनी शून्याचा शोध, गणिती सूत्रे, शल्यक्रिया, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, खगोलशास्त्र अशा विविध क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक कामगिरी केली. नालंदा, तक्षशीला यांसारख्या विद्यापीठांमध्ये जगभरातून विद्यार्थी येत. जपान, फ्रान्स, जर्मनी सारख्या अनेक देशांमध्ये आजही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. या देशांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे पाश्चात्य ज्ञान, विज्ञान, वाङ्मय स्वभाषेत आणले परंतु शिक्षणाचे माध्यम नाही बदलले.

पार्ले टिळक विद्यालय गेली 100 वर्ष मातृभाषेतून शिक्षण देत आहे. त्याबरोबरच आपण पहिलीपासूनच केंब्रिज वर्ग, ५ वी पासून सेमी इंग्रजी वर्ग, इंग्रजी संभाषण वर्ग घेतच आहोत.

**माझी मायबोली असे मराठी**
**बाळगू का भीती**
**त्यानेच होईल माझी उन्नती**
**ऋण तिचे माझ्यावरती ||**

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन संस्थेने व पार्ले टिळक विद्यालय मराठी शाळेने २०२१ साली १०० वर्षे पूर्ण केली. आपल्या सर्वांच्या सकारात्मक पाठिंब्यावर अजून १०० वर्षेही मराठी शाळा अभिमानाने पूर्ण करेल याची मला खात्री आहे.

**- लतिका ठाकूर**
**मुख्याध्यापिका, पार्ले टिळक विद्यालय माध्यमिक विभाग**
**Guest Editor of the month**

# Entrepreneurship, Innovation and Ideation at PTVA






The PTVAIM's Centre of Entrepreneurship and Innovation organised a Start-up Expo on March 4 at the PTVA's Institute of Management. The main aim of the Start-up Expo was to give wings to imagination and creativity and to foster a culture of innovation in the students. Shri Sameer Joshi who is the Founder and Chairman of Transcender Services Pvt. Ltd graced the function as chief guest along with PTVA president Shri Anil Ganu

The students of PTVEMS (Secondary Section) secured the second prize in the school group for their presentation: "3D printing and its applications, and possibilities ahead."

**Participating students:** Swaranjali Jankoli IX D, Swarali Jankoli IX D, Sonal Sutar IX D, Dhruva Gore IX D, Mugdha Wagh IX A, Vaishnavee Gotad IX A, Naina Pawar IX B, Manasvi Mayekar IX B, Divyanka Nirgun IX B, Prapti Narvekar IX B, Vedant Gurav IX B, Rashi Ghuge IX B, Shantanu Bedekar IX C, Sarthak Dalvi IX D, Sahil Bhise IX D

In the same event, three students of standard VI studying in PTVA's English Medium School, Andheri - Tanisi Kapoor, Kshitij Patkure and Manswi Patkure, were selected to present the Human Cells model in the 3D Printing Stall. Shri. Mayur Khanvilkar (COEI Resource Person) guided the students in making this model.

The students got an opportunity to showcase their innovative thinking and entrepreneurial skills to various investors, industry experts and the extended community. It was a proud and memorable moment for the participating team as it received the first prize in the school category.

In a similar vein, in December last year, the Centre of Entrepreneurship and Innovation conducted a workshop for the students of standard VII of PTV ICSE, on ideation and problem-solving – the two skills that are pivotal in all walks of life. The workshop aimed to inspire and motivate students to build ideas to solve problems in various aspects, be it education-related, water conservation, traffic management, waste management, energy conservation, etc. The students were required to identify the potential problem and find the optimum and unique solution through group activity. It was a great learning experience for the students.

# शैक्षणिक विषयावरील शिक्षक क्षमता संवर्धन प्रशिक्षण शिबीर संपन्न

सर्वसमावेशक शिक्षण कसे असावे ? शैक्षणिक साहित्य कसे तयार करावे? या आणि अशा शैक्षणिक विषयावरील क्षमता संवर्धन प्रशिक्षण शिबीर रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनने पार्ले टिळक विद्यालय व परांजपे विद्यालय मराठी माध्यम, माध्यमिक विभाग या दोन्ही शाळेतील शिक्षकांसाठी आयोजित केले होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागत व प्रास्ताविक पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या समन्वयक सौ. जान्हवी खांडेकर यांनी केले.

राज्य शिक्षण बोर्ड सदस्य श्री. शरद दळवी सरांच्या मार्गदर्शनाखाली पहिले व दुसरे सत्र आयोजित करण्यात आले होते. या सत्रात कृतीतून शिक्षण अंतर्गत वेगवेगळ्या शैक्षणिक





साहित्याचा उपयोग वर्गात कसा करता येईल (नवीन शैक्षणिक धोरणात कृतीतून शिक्षण पद्धतीवर भर आहेच) सर्वसमावेशक शिक्षण कसे असावे? शैक्षणिक साहित्य कसे तयार करावे? गणित व इंग्रजी विषयातील अनेक घटक सहज कसे शिकवता येतील? यावरील शैक्षणिक साहित्य त्याचप्रमाणे अनेक क्लृप्त्या सांगितल्या. शिक्षकांनी आपल्याकडील अनुभव आणि ज्ञानाची देवाणघेवाण केली. दुपारी भोजनानंतर दिलीप नवेले सरांनी निसर्गरम्य परिसरात असलेल्या प्रबोधिनीच्या भव्य वाचनालयाची माहिती शिक्षकांना दिली. अभ्यासपूर्ण व कलात्मक रचना असलेले हे वाचनालय पाहून झाल्यानंतर लगेचच तिसऱ्या सत्राला सुरुवात झाली.

मराठी भाषेच्या तज्ज्ञ आणि पुणे येथील ज्ञानप्रबोधिनी शाळेतील शिक्षिका श्रीमती जयश्री काटीकर यांनी अध्यापन अधिक व्यापक, सखोल आणि रंजक कसे करता येईल यावर शिक्षकांना मार्गदर्शन केले. शेवटच्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार तसेच वयम् या मासिकाच्या संपादिका शुभदा चौकर यांनी 'मराठी शाळा शिक्षक मनोबल' याविषयावर व्याख्यान दिले. यामध्ये मराठी शाळांमधील विद्यार्थी कमी होण्याची कारणे, पालकांची विचारधारणा, आत्मविकासासाठी मातृभाषाच योग्य कशी ? याविषयी पोटतिडिकीने आपला विषय मांडला.

“आमच्यासाठी हे अतिशय उपयुक्त प्रशिक्षण होते. एक दिवसीय राहण्याचेही प्रशिक्षण चालले असते”, अशा प्रतिक्रिया सर्व शिक्षकांनी दिल्या. यातच प्रशिक्षणाचे फलित दडलेले आहे.

# PTVEMS' secondary section shines at the Science Exhibition





A Science Exhibition 2022-23 was organised by the Education Department from January 30 to February 1 at R.N. Sheth Vidyamandir, Jogeshwari. Parle Tilak Vidyalaya English Medium School (Secondary Section) secured the first prize in the senior group project category in that exhibition.

The Golden Touch (Phi) - a project on Golden Ratio was presented under the theme: Technology and Toys and the sub-theme: Mathematics for us. In Mathematics, there is a golden ratio of 1:1.6. This ratio is found in patterns throughout nature. The school's project was based on applying this ratio in designing toys.

The project was prepared under the guidance of Science and Maths teacher Mrs. Smruti Mogrey. Deputy Headmistress Mrs. Yamini Dalvi also offered creative inputs to the students.

Aayush Aagashe (IX D) and Soham More (IX D) were a part of the winning team who were assisted by Tanisha Tamhankar (VIII D), Sakshi Patil (VIII D), Kritika Halwai (VIII D), Shriya Sardesai (VIII D), Girija Golapkar (VIIID), Arnav Geete (VII C), and Chinmayee Naravane (VII B).

In the same exhibition, the school's Nature Club - The Young Explorers Nature Club- was declared the third-best Nature Club in the KP East Ward. Mrs. Anjalee Bhoj, Mr. Kalpesh Satra, Mrs. Shashi Gupta and Mrs. Prachi Kawle are the school's Nature Club advisors.

An inter-school Science Skit Competition too was held as a part of the same Science Exhibition. In the junior group drama category, PTVEMS (Secondary Section) won the first prize at the ward level for the Marathi drama "कहाणी थेंबाची" which was based on the theme, "Save water." The skit was written and directed by Vidnyapana Gokarnakar and Minal Deo. A few of their colleagues also helped the two teachers.

Arya Deshmukh (VIII B), Sakhi Telang (VII B), Soham Joshi (VIII B), Daksh Prajapati (VIII C), Deesha Bhat (VIII C), Vedang Joshi (VIII C), Anurag Chaphekar (VIII D), Sannidhi Nair (VIII B), Sharvi Vaidya (VIII B), Stuta Divekar (VIII B), and Sukumar Damle (VIII C) participated in the play who were supported by Tejomay Oak (VII D) on Keyboard, Rajas Kunte (VIII D) on Tabla, and Malhar Joshi (IX C) on Guitar as well as singers Shravani Wagle (VIII C), Shreemayi Wagle (V C), and Paalavi Vedpathak (VIII D). Backstage assistance and artwork was looked after by Avani Walke (IX C) and Shreya Joshi (IX C).

# Dr. Aditi Rangnekar visits her Alma Mater




The Science Club of PTVEMS - Eureka organised a session for the Science Club members on March 1 to interact with Dr. Aditi Rangnekar, Paediatric Surgeon and Assistant Professor at KEM Hospital, Mumbai. Dr. Aditi is an alumnus of the school (2006 batch).

In an interactive and engaging session, the students asked Dr. Aditi intriguing questions about medicine. She answered all the questions in simple words. She also motivated the students to follow their dreams and choose a field of their liking. It was an enriching session for the students.




# Students get practical knowledge through different science workshops

Last month, the Mumbai Grahak Panchayat held two workshops for the Science Club members studying in standard VIII at PTVEMS.

In the first workshop, the students were shown how to identify adulteration in simple daily food items like milk, turmeric, saffron, black pepper, red chilli powder, etc., and in the second workshop, they were taught how to read the food label and what the symbols and acronyms on the packets stood for.

Besides, a first aid workshop was also organised for students of standard IX on the school premises. Dr. Swati Kale conducted it on behalf of the Junior Red Cross Society. 52 students participated in the two-day workshop. It had discussions and demonstrations of the various techniques used in helping a patient during an emergency.

# When the students become SCIENTISTS for a day!



In India, National Science Day is celebrated every year on February 28. On this day in 1928, physicist Sir C. V. Raman discovered the Raman effect. To commemorate his achievement, National Science Day is celebrated across the country.

PTVA's English Medium School, Andheri, also celebrated National Science Day. This year's theme was "Global Science for Global Well-being". The school conducted different science-based activities in which all the students participated.

The day started with Shweta Yadav's informative and eloquent speech, in which she explained the importance of celebrating this day. After this, science experiments, lab sessions, and other related activities were conducted for students across standards first to sixth.

The students of standards fifth and sixth had a great time during the lab sessions. They performed experiments like the 'Iodine Test of Starch', Linear Propagation of Light', and other experiments based on the principles of Magnetism.

For students of standards first to fourth, science experiments such as 'Float and Sink', 'Magic with Magnet', 'String Telephone', 'Turmeric Trick', 'Spinner', 'Magical Toy', etc. were demonstrated. The students later performed these experiments under the guidance of their teachers.

All the students enjoyed performing experiments. It was as if they had become scientists for a day! It was a fun-filled day.

# 'कुतूहल' विषयावरील मार्गदर्शनाने विज्ञान दिन साजरा

लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासंबंधी तसेच आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी कसा विचार करावा यासंबंधीचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना पार्ले टिळक (मराठी माध्यम) विद्यालयातील जिज्ञासा विज्ञान मंडळातर्फे 'राष्ट्रीय विज्ञान दिना'निमित्त आयोजित कार्यक्रमात करण्यात आले.

जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकट रामन यांनी 28 फेब्रुवारी 1922 रोजी आपला शोधनिबंध प्रसिद्ध केला. त्या शोधाला पुढे रामन इफेक्ट्स म्हणून जगभर मान्यता मिळाली. या शोधासाठी डॉ. सी व्ही रामन यांना मानाचे नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून 1988 पासून 28 फेब्रुवारी हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो.

पार्ले टिळक विद्यालयात ध्वनिक्षेपित कार्यक्रम, फलक लेखन तसेच सर सी व्ही रामन यांची माहिती व चित्रे प्रवेशद्वारापाशी लावण्यात आली होती. प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून साठ्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.माधव राजवाडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांचा परिचय व विज्ञान मंडळातर्फे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस समारंभ संपन्न झाला. 'कुतूहल' या विषयावर राजवाडे सरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला तेव्हा ते म्हणाले, शोध लावण्यासाठी, प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी जिज्ञासा असावी लागते. तसेच या प्रश्नासंबंधीची पार्श्वभूमी, सध्याच्या परिस्थितीची माहिती असणे आवश्यक असते. यावेळी विद्यार्थ्यांना त्यांनी काही प्रश्न विचारले. जर पृथ्वीची गती थांबली तर? भूपृष्ठावर एकाच वेळी जगभरातील सर्व लोकांनी उडी मारली तर काय होईल? खड्डा पडेल का? यासारख्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी कसा विचार करावा यासंबंधीचे मार्गदर्शन उदाहरणासह त्यांनी केले.

# PTVA schools celebrate Marathi Bhasha Diwas in a grand style!








Marathi Bhasha Diwas is celebrated every year on February 27 to commemorate the birth anniversary of the Dyanpeeth award winner late poet V.V. Shirwadkar, also known as Kusumagraj.

The students of the secondary section of Parle Tilak Vidyalaya (ICSE) participated in a spectrum of cultural events to honour the Marathi Language. The students enacted a beautiful skit titled 'Kavya Pratibha' and sang a mesmerizing medley of Marathi poems written by great Marathi poets. The assembly concluded with a stunning dance performance.

Similarly, the primary section of PTVEMS organised a beautiful programme to celebrate Marathi Din. Mrs. Smita Biwalkar, Principal of PTVEMS' secondary section, was invited as the guest of honour for the event.

The celebrations began with the PTVEMS's primary section's Head Mrs.Kalpana Kalekar garlanding the photo frame of Kusumagraj. It was followed by students performing a skit, "मराठी दिन की दीन", written by the Chief Guest for the day, Mrs. Anvaya Kane, a teacher from the PTVEMS' secondary section.

'Sahitya Prakar' was another item in the sequence where the students were introduced to all the genres of Marathi literature. A melodious song - महाराष्ट्र भूमि, ही कर्मभूमि was sung by the students who were accompanied by the music teacher. The celebrations concluded with a procession "ज्ञानयात्रा."

> आपल्याला ज्या संस्थेने घडवले त्याच शाळेत आपली मुलेही शिकावीत व त्यांचे व्यक्तिमत्त्व घडावे अशी मनापासून इच्छा ठेऊन आम्ही मुलांसाठी पार्ले टिळक शाळेची निवड केली. माझ्या मुलांची मातृभाषा मराठी आताच्या इंग्रजी मिडीयमच्या शाळेमध्ये मुलांच्या मराठीचा विकास कसा होईल? त्यांना मातृभाषेचे, मराठीचे महत्त्व व आपल्या मराठी वाङ्मयाचा परिचय कसा होईल? असे अनेक प्रश्न व धाकधूक मनात होती. पण शाळेच्या नावारूपाप्रमाणेच व परंपरेला साजेसे असे मराठीचे उत्तम बाळकडू मुलांना शाळेत मिळत आहे याचा अतिशय आनंद व समाधान आहे.
>
> मराठी राजभाषा दिनानिमित्त झालेले विविध कार्यक्रम अतिशय मार्मिक आहेत आणि सर्वच मुलांच्या मनावर मराठीचे महत्त्व या निमित्ताने ठसणार आहे. आमची मुले आठवड्यातील 5 दिवस दररोज 6 तास शाळेत असतात. शालेय जीवनात झालेले संस्कार आयुष्यभरासाठी असतात. पार्ले टिळक शाळेने मराठी भाषेची जोपासना व्हावी या हेतूने जे विविध उपक्रम राबवले आहेत त्याबद्दल त्यांचे आभार. **- सौ. मृदुला शेखर ( parent of PTVEMS primary)**

# परांजपे विद्यालयात विविध कार्यक्रमातून मराठी राजभाषा गौरव दिन साजरा




मराठी साहित्यातील अग्रगण्य कवी, लेखक, कादंबरीकार, नाटककार, कथाकार, समीक्षक कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस परांजपे विद्यालय माध्यमिक शाळा अंधेरी येथे विविध कार्यक्रम आणि स्पर्धा आयोजित करून मराठी राजभाषा गौरव दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.

शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री.हाक्के यांच्या हस्ते कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व ग्रंथपूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेच्या सभागृहात विविध कार्यक्रमांचे तसेच ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेष परिधान करून मराठीचा जयघोष करीत लेझीम पथकाच्या विविध अविष्कारांसह ग्रंथदिंडी काढली. त्यानंतर महाराष्ट्र राज्यगीत सादर केले. श्रीमती. बर्वे यांनी विद्यार्थ्यांना मराठी दिनाचे महत्त्व विशद केले. मराठी दिनानिमित्ताने शाळेतील वाङ्मय मंडळातर्फे राबविण्यात आलेल्या कथाकथन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यातील यशस्वी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पद्धतीने आपली सादरीकरणे करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. श्री. हाक्के यांनीही आपल्या मातृभाषेचा आपल्याला अभिमान हवा. आपण जाणीवपूर्वक व मनःपूर्वक मराठी भाषेचा वापर आपल्या संभाषणांमध्ये केला पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले. मराठीची महती सांगणारी एक कविता सादर केली. त्यानंतर श्रीम. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांनी मराठीची गौरवशाली परंपरा सिद्ध करणारे एक बहारदार नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. श्री. गोरुले यांनी आपल्या सुंदर हस्ताक्षराने शाळेचे फलक सजवले. मराठी भाषेची थोरवी सांगणारे तक्ते, चित्रे, कविता यांच्या माध्यमातून भाषेचे सौंदर्य, मराठी भाषेचा गोडवा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाङ्मय मंडळातील सर्व विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतरांनीही मोठे मोलाचे योगदान दिले होते.




## जागतिक मराठी भाषा दिन



**परांजपे विद्यालय प्राथमिक विभागात 'जागतिक मराठी भाषा दिन' अत्यंत जल्लोषात साजरा करण्यात आला. पारंपारिक वेषात विद्यार्थ्यांच्या लेझीम नाचाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. नंतर मराठी भाषा दिनाचे महत्त्व सांगून कवी वि. वा. शिरवाडकरांची माहितीरूपाने ओळख करून देण्यात आली. त्यांच्या निवडक कवितांचे वाचनही करण्यात आले. दुसरीच्या विद्यार्थ्यांनी 'बोलतो मराठी' या गाण्यावर बहारदार नृत्य सादर केले. तर तिसरीच्या विद्यार्थ्यांनी राजभाषा दिनाची घोषवाक्ये सादर करून कार्यक्रमाला नवी रंगत आणली. शेवटी ग्रंथदिंडीचे आयोजन करून कार्यक्रमाची सांगता झाली.**

## संपूर्ण दिवस फक्त मराठी बोलून साजरा झाला 'मराठी राजभाषा गौरव दिन'




संपूर्ण दिवस कोणतेही परिभाषिक शब्द न वापरता फक्त मराठीतच बोलायचं असं ठरवून शुद्ध, स्पष्ट उच्चारात व प्रमाणभाषेत बोलण्याचा संकल्प करून पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभागात "मराठी दिन" साजरा झाला.

मराठी साहित्यातील अग्रगण्य ज्येष्ठ कवी, लेखक, कादंबरीकार, नाटककार, कथाकार, समीक्षक कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस 27 फेब्रुवारी 'मराठी राजभाषा दिन' म्हणून सगळीकडे साजरा केला जातो.

मराठी या मातृभाषेचा वारसा आणि संस्कार गेली शंभर वर्षे जपणाऱ्या पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेच्या प्रवेशद्वारातून आत आल्यावर आजूबाजूला असलेल्या मराठी साहित्यातील उत्कृष्ट कविता, उत्तरे, सुभाषिते, नाट्य उतारे, पुस्तके लक्ष वेधून घेत होतेच पण त्याचबरोबर फलक लेखन व त्यावर चित्ररूपात अवतरलेले वि. वा. शिरवाडकर जणू समाधानाने सर्वांवर मायेची पखरण करीत होते. शालेय प्रार्थनेनंतर 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' या सुरेल गीताने ध्वनिक्षेपित कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाळेतील विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या माहितीद्वारे या राजभाषा दिनाचे महत्त्व सर्वांना सांगितले. सुमधुर गीतांच्या संगतीने सादर झालेल्या या कार्यक्रमानंतर प्रत्येक वर्गात हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. तसेच शाळेतील सर्व विषय शिक्षकांनी आपापल्या कल्पनेनुसार मराठी भाषिक खेळ घेतले. काही विद्यार्थ्यांनी 'नटसम्राट' या नाटकातील विशिष्ट संवाद एकपात्री अभिनयाने सादर केले, तर काही वर्गात शब्द मनोरा, म्हणी, शब्दांची अंताक्षरी, योग्य विशेषणांचा वापर, क्रिया करून क्रियापदे सांगणे, क्रियापदांना कालानुरूप बदलणे, एका शब्दापासून अनेक अर्थपूर्ण शब्द तयार करणे असे खेळ घेण्यात आले.



'गणित' हा विद्यार्थ्यांना समजण्यास अवघड असा विषय आहे. परंतु हाच विषय प्रत्यक्ष कृतीद्वारे शिकविला तर विद्यार्थ्यांना पटकन उमजतो आणि म्हणूनच पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेमध्ये इयत्ता दुसरीच्या घटकावर आधारित 'आकृतिबंध' ही प्रात्यक्षिक कृती वर्गावर्गातून करून घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या मनाने आकृतिबंध तयार करून ग्रीक राजाच्या मुकुटासारखा मुकुट तयार केला. तसेच इंग्रजीची ओढ असलेला गट मराठीकडे जास्तीत जास्त संख्येने आकर्षिला जावा यासाठी इंग्रजीतून सूचना देऊन 'टोपी बनविणे' हा उपक्रमही इयत्ता दुसरीच्या वर्गात राबविण्यात आला.

## चित्रकला स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन गौरव



प्रहार वृत्तपत्रातर्फे परांजपे विद्यालय माध्यमिक विभागात चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या चित्रकला स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आयोजकांतर्फे पारितोषिके देण्यात आली.

या कौतुक समारंभात व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्रहार वृत्तपत्राचे वितरण व्यवस्थापक शाहिद अख्तर तसेच त्यांचे सहकारी सुरेश जाधव, रमेश शेट्टी व परांजपे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. हाक्के उपस्थित होते. श्री. हाक्के सरांनी अध्यक्षांचे स्वागत करून त्यांची ओळख करून दिली. कौतुक सोहळ्याचा हेतू स्पष्ट केला. प्रहार वृत्तपत्राचे व्यवस्थापक शाहिद अख्तर यांनी विद्यार्थ्यांनी काढलेल्या सुंदर चित्रांचे कौतुक करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. तसेच या वृत्तपत्रातर्फे विद्यार्थ्यांना कोणकोणती सदरे छापली जातात व उपक्रम राबवले जातात हे सांगितले. प्रहार वृत्तपत्रातर्फे घेण्यात आलेल्या या चित्रकला स्पर्धेत इयत्ता पाचवी, सहावीच्या गटातून प्रथम क्रमांक राऊत अश्विनी रमेश, द्वितीय क्रमांक पांचाळ समृद्धी सचिन आणि तृतीय क्रमांक मेणे मीत रवींद्र यांनी पटकावला. तसेच इयत्ता सातवी, आठवीच्या गटातून प्रथम क्रमांक सुतार श्रेया विजय, द्वितीय क्रमांक नवले नील किरण आणि तृतीय क्रमांक ताकवले तृप्ती सतीश यांनी पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षकांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.



पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांनी कराटेमध्ये "ब्ल्यू बेल्ट" परीक्षा देऊन चांगल्या गुणांनी ते यशस्वी झाले. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मानचिन्ह देऊन कौतुक करण्यात आले.

अंधेरी येथील परांजपे विद्यालयात विज्ञान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयातील शिक्षक श्री. गोरुले यांनी आपल्या सुंदर हस्ताक्षरात विज्ञान विषयक फलक व चित्रे रेखाटून विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानाची महती व संशोधकांची थोरवी पोहोचवण्याचा प्रयत्न केला. श्रीमती आपटे व शाळेतील विद्यार्थी यांनी ध्वनिक्षेपित कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्व व शास्त्रज्ञांचे विश्व उलगडून दाखवले. त्यानंतर विज्ञानाचे महत्त्व सांगणारे एक विज्ञान गीत सादर करण्यात आले.




## कर्तव्य, पराक्रम आणि आदर्श जीवन या गुणांचे स्मरण आणि आचरण म्हणजे



# ॥ रामनवमी ॥

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥४-७॥**
**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥४-८॥**

"जेव्हा जेव्हा जगात धर्माचा म्हणजेच सदाचाराचा नाश व्हायला लागतो आणि अधर्माचे राज्य वाढू लागते, तेव्हा तेव्हा मी पृथ्वीवर अवतार घेतो". तसेच "सज्जनांचे संरक्षण करण्यासाठी आणि दुष्टांचा संहार करण्यासाठी, धर्माची पुन्हा स्थापना करण्यासाठी वेळोवेळी मी जन्म घेतो." असे भगवान श्रीकृष्ण म्हणतात.

अशाचप्रकारे जेव्हा पृथ्वीवर रावणाने हाहाःकार माजवला तेव्हा रावणाचा वध करण्यासाठी श्री विष्णू रामाच्या अवतारात पृथ्वीवर आले. चैत्र शुद्ध नवमी हा हिंदू पंचांगानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस आहे. या तिथीस भगवान विष्णूचा सातवा अवतार समजले गेलेले श्री राम यांचा अयोध्येत जन्म झाला, अशी मान्यता आहे. हा दिवस 'श्री रामनवमी' म्हणून साजरा करतात. त्या दिवशी दुपारी सूर्य डोक्यावर आल्यावर (दुपारी १२:०० वाजता) रामजन्माचा सोहळा होतो. यावेळी श्रीरामाची मूर्ती पाळण्यात ठेऊन पाळणा गातात आणि सुंठ साखरेचा प्रसाद वाटला जातो.

श्रीराम हे भारतवासीयांचे फार आवडते दैवत आहे. श्रीराम हे एक आदर्श पुरुष होते. प्रभू श्रीरामांना मर्यादापुरुषोत्तम असेही म्हणतात. मातृ-पितृभक्ती, बंधुप्रेम, सत्य वचनाचे व्रत, प्रजाप्रेम असे अनेक आदर्श गुण त्यांच्यामध्ये होते. ते एकवचनी होते. त्यांच्या राज्यातील प्रजा अत्यंत सुखी आणि समाधानी होती. म्हणून आदर्श राज्याला "रामराज्य" म्हणतात.

श्रीरामांचा आदर्श आपल्या मुलांसमोर राहावा यासाठी मुलांना रामायणातील कथा सांगतात. रोज संध्याकाळी त्यांच्याकडून रामरक्षा स्तोत्र म्हणवून घेतात. अशा या प्रभू श्रीरामांचे वर्णन रामरक्षा स्तोत्रात अतिशय सुंदररित्या केलेले आहे.

**दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे तु जनकात्मजा ।**
**पुरतो मारुतिर्यस्य तं वन्दे रघुनंदनम ॥**

'म्हणजेच ज्यांच्या उजव्या बाजूस लक्ष्मण, डाव्या बाजूस जनकाची कन्या (सीतामाई) आहे. तसेच ज्यांच्या समोर रामरूप झालेला मारुती आहे अशा त्या रघुनंदनाला आम्ही नमन करतो'.

**- प्रियांका बर्वे, शिक्षिका,**
**परांजपे विद्यालय प्राथमिक विभाग.**






पार्ले टिळक विद्यालय मराठी प्राथमिक शाळेत आयोजित केलेल्या नृत्य स्पर्धेसाठी १८ शाळांचा सहभाग होता. यावेळी स्पर्धेत शाळेला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. हा समारंभ भव्य दालनात पार पडला. तर लंगडी स्पर्धेसाठी वीस शाळांचा सहभाग होता. ही स्पर्धा बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग खाजगी प्राथमिक अनुदानित शाळा के-पूर्व, के- पश्चिम, एच-पूर्व व एच-पश्चिम या विभागातून घेण्यात आली होती. शाळेतील मुलांच्या गटाला आणि मुलींच्या गटाला "तिसरा क्रमांक" प्राप्त झाला. शाळेला दोन ट्रॉफी व विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट देण्यात आले.

# Writing books at a young age? PTV ICSE students have done it!

Reading books is a habit that children are encouraged to form from an early age. But writing books at tender age is something quite rare. At PTV ICSE school, the students are motivated to develop this rare quality of writing a book. Not just this, they are provided with a solid end-to-end platform which enables them to write, publish, and sell books online. Under the school's unique initiative of "Bribooks", students of PTV ICSE have successfully written and published their books through this platform. To search for the name of students and the books they have written, log in to www.bribooks.com.



| Name of the student | Name of the book |
|---|---|
| Arya Bhat (IV) | Coorg Diaries |
| Disha Jadhav (IV) | The Journey of Victory |
| | Chase your Dreams |
| Ipsit Dakshikar (IV) | The Spirit of Football |
| Reva Modak (IV) | The Mystery of Missing Crown |
| Saumya Limaye (IV) | A fun filled Birthday |
| William Passanha (IV) | Victory against all Odds |
| Anoushka Panse (IV) | The Helpful |
| Mihira Shukla (IV) | Girl who brought back Magic |
| Swara Kanekar (IV) | Bingo and his Friends |
| Swara Pandit (IV) | Curse of the Seven Diamonds |
| Aria Karandikar (IV) | Adventures of Emma Squirelzy |
| Jija Chavan (IV) | The Magical Girl |
| Mandeepa Baishakha (IV) | The Magical Hat |
| | My Memorable Moments |
| Ovee Sawant (IV) | Unicorns in Cosmic Space |
| Pavithra Narayanan (IV) | Malinda the Master of Spells |
| Reyansh Singh (V) | The True Friend |
| Shravani Mahadik (V) | My Vacation with my Family |

| Name of the student | Name of the book |
|---|---|
| Swethan Gawali (VI) | Detective George |
| Ruvee Godambe(VI) | Ethan - The Magical Adventure |
| Kavya Vihurkar(VI) | A Chess Competition In London |
| Saachi Soumitra(VII) | Outcastes |
| Yutika Patki(VII) | Adventure Of A Lifetime |
| Kimaya Mahindrakar(VII) | My First Crush |
| Avneesh Tanksale(VII) | Victory And Defeat |
| Mrunmayee Salvi(VII) | Friendship With Indians |
| Saee Patwardhan (VII) | Book Of Hiku |
| Ved Bhatwadekar(VII) | A Trip To London |
| Advayaa Bhide(VII) | Who Did It To Bob? |
| Aditya Jadhav(VIII) | The Start Of An Adventure |
| Dhruv Holkar(VIII) | Zombie Attack |
| Riya Gadre(VIII) | How To Save A Life |
| Avanti Vete(VIII) | Of Embers And Pains |



Besides, some students of standards VI to VIII have published their books with ISBNs issued by the Ministry of Education. They have also starred at the National Young Authors Fair - the world's largest book writing competition.

## Kids having fun at KidZania

A picnic to KidZania was organised for the students of standard III of PTV ICSE on February 13. KidZania is an indoor theme park located in Mumbai with an array of offerings that help children build their social and cognitive skills. The students of PTV ICSE had an enjoyable time at KidZania as they got opportunities to don several real-life roles and play exciting games. It was a fun-filled trip for the students.



## Imagicaa Calling!



All work and no play makes Jack a dull boy is an adage often heard. To bring some playful fun in the lives of students of standard IX, PTV ICSE decided to arrange for a thrilling trip to Imagicaa on March 11. After the successful completion of their exams, the students deserved a much-needed break and the school caught this pulse and took them to this fascinating entertainment themed park. The students enjoyed different amusement rides and spent time together. They also relished some mouth-watering delicacies and took back home some fond memories which they would cherish all their lives, as they are on the brink of completing their schooling.

## The Silent Warrior

Mahatma Gandhi believed in non – violence,
He believed in the power of silence.

Others fought with weapons,
He fought with words,
He believed India could get independence without the use of guns and swords.

Their approaches were different but their goal was the same They fought on and on till India's independence was reclaimed.

A lawyer, a politician, an activist, a freedom fighter,
He worked so hard to make India's future brighter.

Non – cooperation and Civil Disobedience were the movements he launched, He recruited followers who were loyal and staunch.

He believed in the importance of truth, simplicity, and faith, He organised marches and fasts where he didn't eat for days.

He revolutionized the way in which people thought, With courage and non-violence he fought,
A different way of fighting he taught.

He saw the world in a different way,
And his principles continue to inspire, to this day,
Etched in our memory, forever he will stay.



Composed by
**Saachi Soumitra,**
**VII A, PTV ICSE**

# 'गाऊ त्यांना आरती' काव्यवाचन कार्यक्रमाने मराठी दिन साजरा

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षातील मराठी राजभाषा दिन हा दुग्धशर्करा योग साधत मराठी कवींचे स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान विशद करणारा 'गाऊ त्यांना आरती' हा काव्यवाचनाचा कार्यक्रम पार्ले टिळक विद्यालय इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेत सादर करून मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात एकपात्री अभिनय स्पर्धेतील विजेत्यांच्या सादरीकरणाने झाली. विद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळातर्फे वर्षभर आयोजित केलेल्या कथाकथन, निबंधलेखन, काव्यपूर्ती, एकपात्री अभिनय, कविता अभिवाचन अशा विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध कवी संकेत म्हात्रे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. सूत्रबद्ध निवेदन आणि दिग्गज कवींच्या कवितांचे उत्तम सादरीकरण यामुळे हा कार्यक्रम प्रमुख पाहुण्यांच्या आणि उपस्थितांच्या कौतुकास पात्र ठरला. २६ फेब्रुवारी रोजी असणाऱ्या स्वा. विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन म्हणून 'जयोस्तुते' हे गीत सादर करण्यात आले.

प्रमुख पाहुणे कवी संकेत म्हात्रे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मुले असुनही सर्वजण खूप छान अस्खलित मराठी बोलत आहेत हे पाहून आनंद झाल्याचे त्यांनी सांगितले. मराठी भाषेचे महत्व स्पष्ट केले. लाभले आम्हांस भाग्य हे कवी सुरेश भट यांनी रचलेले गीत त्यांनी विद्यार्थ्यांसह गायले.

कार्यक्रमाच्या शेवटी राजा बढे लिखित गर्जा महाराष्ट्र माझा या गीताची ध्वनिचित्रफीत दाखवण्यात आली. आणि त्यानंतर कविवर्य कुसुमाग्रजांनी रचलेल्या महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मराठी राजभाषा दिन



पार्ले टिळक विद्यालय मराठी प्राथमिक शाळेत "मराठी राजभाषा दिन" दिमाखात साजरा झाला. शाळेच्या परिसरात भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. विद्यार्थी पारंपारिक वेशभूषेत आले होते. कविता, गाणी, मराठी भाषेचा जयजयकार, जयघोष, अभंग, पोवाडा म्हणत परिसर दुमदुमून गेला. १ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शैलीत विविध कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमात कथा, बालगीते, नाटुकले, अभंग, कविता, गाणी, लेखक, कवींची माहिती असे साहित्यप्रकार विद्यार्थ्यांनी सादर केले. विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह दिसून आला.



पार्ले टिळक विद्यालय मराठी प्राथमिक शाळेत जागतिक महिला दिनानिमित्त महिला पालकांची वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. महिलांच्या जीवनाशी निगडित विषय ठेवण्यात आला होता. एकूण ११ स्पर्धकांनी यात भाग घेतला होता. सर्वांनी प्रभावीपणे दिलेल्या विषयावर आपले मत आणि विचार परखडपणे मांडले.

## Celebration of Womanhood at PTV (ICSE)!





International Women's Day was celebrated on March 8 at PTVA (ICSE). The male staff members of the school enthusiastically hosted the event for their female colleagues. A heart- warming video was presented celebrating womanhood. It was followed by each male staff member speaking a few words of respect and appreciation for the teachers. At the end of the programme, each female teacher was gifted with a sketch of herself made by the Art teacher Mr. Rajendra Hadkar.

## स्त्री शक्तीला सलाम !



महिलांना त्यांच्या बलिदान, संघर्ष आणि यशाच्या स्मरणार्थ समर्पित आणि सन्मानित करणारा दिवस म्हणून आठ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा येतो. नारीशक्तीला परांजपे विद्यालय प्राथमिक विभाग आणि माध्यमिक विभागात मानाचा मुजरा देण्यात आला. प्राथमिक विभागात महिला पालकांची स्मरणशक्ती स्पर्धा आणि गाण्यांची अंताक्षरी स्पर्धा घेण्यात आली. दोन्ही स्पर्धांना महिला पालकांनी उदंड प्रतिसाद दिला. या स्पर्धांमध्ये एकूण ३० महिला पालकांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी ५ महिला विजयी झाल्या. तर माध्यमिक विभागात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान स्त्रिया आणि त्यांचे कार्य प्रसिद्धी फलकावर प्रदर्शित करण्यात आले होते. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी ध्वनिक्षेपित कार्यक्रमाद्वारे उद्यमशील स्त्रियांच्या विविध भूमिका स्पष्ट केल्या. शाळेतील श्रीमती. सोनावणे यांनी एका स्वरचित कवितेद्वारे स्त्रियांच्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा दिला. त्यानंतर स्फुर्तीगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.











## Students come out with flying colours

Holi was celebrated with zeal and enthusiasm by the primary section of PTVEMS. The students played with colours and created beautiful art pieces out of them.

"Holi activity" was conducted for all the students of standard I to IV. The students were briefed about the importance of this festival and how they should celebrate it safely. The display board was decorated with beautiful artwork done by the students. The Holi celebrations were memorable for all the students of the primary section of PTVEMS.

## होली

होली है रंगोंका त्यौहार,
आपस में है प्रेम-व्यवहार |
आओ मिलकर मनाए होली,
लाल, पीला, हरा, गुलाबी |
गुलाल के रंग बड़े निराले,
रंगों में सब घुल-मिल जाए |
हम सब मिल कर होली मनाएँ,
चारों ओर से गुलाल उड़ाएँ,
बच्चे-बुढ़ें सब नाचे-गाएँ |
हर घर में बने मिठाइयाँ,
आओ मिलकर मनाएँ खुशियाँ |
होली जाएँ मनभर आए,
अगले बरस फिर खुशियाँ लाए |
होलीहैरंगोंकात्यौहार,
आपसमेंहैप्रेम-व्यवहार।



**Debyani Basu,**
**III C, PTV ICSE**

# PTVEMS' Parth Talkokul to seek Football Training in Germany

Parth Talkokul (standard VIII), a student of Parle Tilak Vidyalaya English Medium School (Secondary Section) is among the 20 players selected to be a part of the prestigious training programme by FC Bayern in Munich, Germany.

Maharashtra State and FC Bayern had organised a U14 Maharashtra Cup Football Tournament from February 27 to March 3 at Shree Shiv Chhatrapati Krida Sankul at Balewadi, Pune.

20 best football players from Maharashtra who performed well in this tournament have been selected by the Sports Director, Mr. Brosmer of FC Bayern. These players will be given special training in Munich, Germany.



PTVEMS' secondary section won runner up title in the same tournament.



## Maharashtra Nature Park

The members of the Young Explorers Nature Club (standard VII and VIII) of PTVEMS were taken on a visit to Maharashtra Nature Park on March 6.

# "Excellence is not being the best....it is doing your best."

**In a first of its kind, the SSC 2021-22 school topper of PTVEMS, Stuti Dave, is interviewed by her junior Madhura Chavan, the school's Head Girl.**




**Madhura: What advice would you like to give our students gearing up for the annual examination?**

**Stuti:** I suggest you begin by preparing a timetable for each day. Adhering to that timetable remember is important. Compare your actual progress with your expectations and cover whatever remains, within the next few days, to avoid backlogs.

**Madhura: Why is paper presentation important?**

**Stuti:** Paper presentation is a vital aspect that should be considered. There should be something unique which will set our paper apart from others. The first impression is often the last. Paper presentation can play an important role in the overall outcome. Good, legible handwriting, underlining the keywords, etc., are very important. Neatness in presentation makes all the difference.

**Madhura: As a school student, were you active on social media? Why?**

**Stuti:** No, I wasn't active on any other social media except WhatsApp. Social media is a distraction that diverts you from your task at hand. One could end up wasting several hours without even realising it.

**Madhura: What should we remember just a few days before the examination?**

**Stuti:** Working hard is the best thing to do, but you must remember to give yourselves a break now and then. Before the exam, revise the entire syllabus a few times. Write down your answers, learn from your mistakes, and avoid making the same mistakes in the exam.

**Madhura: What tips would you give to avoid distractions while preparing for the examination?**

**Stuti:** I always kept my phone away from my study table [perhaps in a different room altogether]. That helped me study without any distractions. One thing is for sure, if you are completely focused, you won't get distracted.

**Madhura: How can we avoid being overwhelmed or nervous before the exam?**

**Stuti:** Firstly, no need to worry if you study regularly. Pressure builds up when there are a lot of backlogs, which can be prevented by studying regularly. After a long day, I would engage in hobbies like reading, drawing, playing the keyboard, etc. I was also regularly attending my hobby classes.

**Madhura: What are the things we should remember on the day of the exam?**

**Stuti:** Keep calm. Be confident, and have faith. It is as important to believe in yourself as you do your best. It is all a game of the mind. If your mind is stable, you will make the best of the situation, but if you are anxious, you will lose marks by making silly errors. Working hard is crucial, but simultaneously having a confident and positive state of mind is important, especially while attempting the papers.

**Madhura: How did you manage stressful situations?**

**Stuti:** There was no external pressure, thanks to my family, which was always by my side. They encouraged me to do my best instead of being judgemental about my scores. I would like to make a special mention of Jayashri Talwalkar, my mentor whose words of wisdom helped me balance academics and other activities in a composed manner. Sometimes I did not get good scores, but I stayed optimistic and learned from my mistakes.

**Madhura: Thank you so much for all the guidance Stuti. I am sure your words will inspire all of us to do our best.**

**Stuti:** The pleasure was mine! Here's wishing each of you the best in the forthcoming examinations.

## Gymnastics



Mumbai School Sports Association (MSSA) organised the Annual Inter-School Gymnastics Competition on February 26 at Wadala BPCA College. Two students of the secondary section of PTVEMS won medals in the U12 Mallakhamb competition. Shivangi Pai won a gold medal and Sanavi Desai bagged a silver medal.

# Now the students of PTVEMS can make eco-friendly colours



A week before the festival, the members of Young Explorers Nature Club (Classes VII and VIII) of PTVEMS participated in a natural colour making workshop. Bombay Natural History Society (BNHS) organised this workshop on March 2.

The workshop aimed to teach the students ways to make colours from fruits, flowers and vegetables. The main goal was to encourage the students to choose safe and eco-friendly natural colours over chemical-based colours.

# New Hindu Year; New Beginning!



In India, every festival has its significance and teaching. Gudi Padwa is a springtime festival celebrated as a traditional new year, and it is the beginning of the month of Chaitra. For years, we have celebrated Gudi Padwa, which has religious and seasonal aspects and scientific significance. There are various dimensions behind celebrating this festival. Scientifically, the intersection of the equator with the meridians is a major scientific event at the beginning of Chaitra. This intersection is known as Vasant. When spring begins, nature refreshes by spreading a separate charm and gratifying atmosphere. This naturally blissful period is worth celebrating, and Gudi Padwa appropriately represents this pleasing seasonal alteration.

At Gudi Padwa, the earth's axis is tilted so that the northern hemisphere receives the highest amount of solar energy. This signifies the beginning of a new time. According to our great Indian Mathematician Bhaskaracharya, the sunrise on the day of Gudi Padwa is the beginning of the New year because the earth exactly completes its one revolution around the sun. It is the beginning of summer (new life) after completing all three major seasons in the previous revolution.

It is also the first day of the beginning of the spring season. From this day onwards, trees and plants start shedding their leaves, and new growth appears. Even nature also signifies the beginning of a new time.

In simple words, New Year means the beginning of a new cycle, a new revolution; on this day, nature itself refreshes to mark the new beginning, to start a new life. In Maharashtra, people worship a ब्रह्मध्वज in their house.

ब्रह्: Principle behind the creation of this world, i.e. energy.

गाठी (sugar): An important energy source in a living organism and is a component of many carbohydrates.

नीम: It prevents the body from infections to sustain energy flow.

महावस्त्र (Cloth): It is a sign of prosperity.

**- Urmila Bhende, Teacher - PTVEMS Primary Section**

# Sports

## Riyana and Shaurya bag silvers!



**Riyana Sarangdhar (II C)**



**Shaurya Lad (IV A)**



**Swati Mohite (III C)**

Riyana Sarangdhar (II C), a student of PTVEMS won silver medal at the 28th Euro Asia International WFSKO Open Karate Championship organised by World Funakoshi Shotokan Karate Organisation at Priyadarshini Sports Complex, Mumbai, on February 12.

PTVEM primary section students - Shaurya Lad of (IV A) won a bronze medal in vault.

Swati Mohite (III C) bagged a silver in balancing beam during the Mumbai Schools Sports Association (MSSA) Gymnastics Competition conducted on February 26 at BPCA College, Wadala.

## When you can make learning FUN and INTERESTING...



Ever imagined you could have fun while learning? If not, here's your chance to flex your imagination because, recently, PTV ICSE conducted exciting activities to make learning fun and easy. Fun and Learn has been a concept that has garnered a lot of popularity in recent times. To keep up with the contemporary times of education, the school has always strived to do something different to help its students enjoy the process of learning.

In its endeavour, the school carried out a couple of activities for its students of standard V - Paper Windmill Activity and Understanding Levers.

In the paper windmill activity, the students took their first steps to renew energy with the wind. The group activity was where students created paper windmills using craft materials and tools. This practical-based approach helped them to understand the otherwise difficult concept very easily.

The other activity – Understanding Levers, was aimed at making the students understand the functioning of class 1, class 2, and class 3 levers in machines. In this hands-on activity, the students learnt the concepts by employing simple and commonly used objects such as popsicle sticks and a few rubber bands.

# Scholarship felicitation

## 14 students of PTVA English Medium School, Andheri, bag scholarships



PTVA's English Medium School, Andheri, felicitated its students, who cleared the pre-upper primary scholarship examination held in July 2022, with flying colours. The felicitation programme was held on February 9 on the school premises. PTVA Director Shri. Pramod Lele graced the event and applauded the students through his words of wisdom. The students received the certificates at the hands of Shri. Lele.

19 students studying in the fifth standard (2021-22) appeared for the examination. Out of them, 14 were declared eligible for the scholarship. The teachers who guided these students for the scholarship examination - Mrs. Mrinalini Mhetre, Mrs.Rutuja Shirke, Mrs. Harshada Mulmule and Ms. Aarti Halbe were also felicitated. Parents of the awardees were also invited to the felicitation programme.

Editor : Mrs Janhavi Khandekar ! Supported by Thanevaibhav and KYT Team